**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या समोरील कामकाज**

---

**श्री.इंगळे वसंत एकनाथराव** ( अपिलकर्ता )
**सिध्देश्वर चौक मळवटीरोड,**
**राजेगावकर सर यांचे घर ,लातूर**

**विरूध्द**

**जनमाहिती अधिकारी तथा** ( उत्तरवादी )
**अव्वल कारकून पुरवठा -6**
**जिल्हा पुरवठा अधिकारी,कार्यालय,लातूर**

**क्रमांक-2013/पुवि/केमाअ/अपील/कावी-567**

**<u>निर्णय</u>**

अपिलार्थी श्री. इंगळे वसंत एकनाथराव, रा.लातूर यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक 13/08/2013 रोजी माहितीच्या अधिकारा खाली मागणी केलेली माहिती न मिळाल्यामुळे या प्राधिकरणाकडे माहिती अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19(1) खाली दिनांक 18/09/2013 रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रकरणात दिनांक 03/10/2013 रोजी सुनावणी ठेवण्यात आली असले बाबत अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी यांना दिनांक 20/09/2013 रोजी नोटीस देवून कळविण्यात आले.

दिनांक 03/10/2013 रोजीच्या सुनावणीस अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी उपस्थित राहून पुढील प्रमाणे म्हणणे मांडले. अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी तथा अव्वल कारकून पुरवठा -6 जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, लातूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली वेगवेगळया आठ (8) अर्जान्वये माहितीची मागणी केली होती. या आठ (8) ही अर्जान्वये माहितीची मागणी केलेली माहिती मिळाली नाही म्हणून वेगवेगळे आठ (8) अपील दाखल केले सदरील सर्व अपील प्रकरणात दिनांक 03/10/2013 रोजी सुनावणी घेण्यात आली. अपिलार्थी यांनी आठ(8) ही अपील प्रकरणात एकच लेखी युक्तीवाद सादर केला तो पुढील प्रमाणे.

आपले कार्यालयाचे दिनांक 20/09/2013 रोजीच्या पत्राव्दारे कळविलेप्रमाणे दि.03/10/2013 रोजी प्रत्यक्ष हजर राहून मी माझे लेखी म्हणणे सादर करीत आहे. या बाबत हे की, मी वसंत एकनाथ इंगळे रा मळवटी रोड लातूर यांनी माझ्या नावे केरोसीन परवाना क्रं. 91822 जो मला 1986 मध्ये मिळाला तरी

हस्तांतरीत केलेला आहे.माझा भाऊ गुंडाप्पा एकनाथ इंगळे यांने सदर परवाना माझे क्षोटे शपथपत्र जोडून दुस-या कोणालातरी हस्तांतरीत केलेला आहे. याबाबत सदर डिलरलायसन परवाना कोणाकडून, कुठे , कसा कोणत्या कागदपत्रा आधारे कोणाला हस्तांतरीत झाला हे जाणून घेण्यासाठी मी आपणाकडे अनेक माहितीच्या अधिकारात अर्ज दिलेले आहेत. सदर अर्जाव्दारे आपण अन्न नागरी पुरवठा विभाग मुत्रालय मुंबई यांना

दिनांक 24/01/2013 आणि 12/03/2013 नुसार केलेल्या कार्यवाहीचे वरीष्ठांकडून काय आदेश होते व आपल्या कार्यालयाने काय उत्तर दिले त्याची कॉपी मागीतली होती. तसेच उपायुक्त साहेब औरंगाबाद यांना आपण माझ्या अर्ज प्रकरणी काय माहिती सादर केली ती मला कळविण्याबाबत आपणास माहिती अधिकार अर्जाव्दारे माहिती मागीतली ती आपण दिलेली नाही. माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे. तसेच आपण मला निलंबीत रद्द परवान्याची जी यादी (दि.12/04/2013) रोजी दिलेली आहे ती अपूरी असून त्यावर परवान्याचे क्रमांक तसेच किरकरेळ व डिलर परवान्याची स्वतंत्र वेगवेगळी यादी परवाना क्रमांकासह दिलेली नाही. निलंबीत आणि रद्द म्हणून दिलेली यादीतील बहुतांश सर्व परवाने चालू आहेत आपण मला हे देखील माहिती खोटी , दिशाभूल करणार आणि अपूर्ण दिलेली असून खरी माहिती देण्यास टाळाटाळ केलली आहे.तसेच लातूर जिल्हयाबाहेर सन.1985 नंतर 2012 पर्यंत किती परवाने हस्तांतरीत केले त्यांचे नावे, परवाने नंबर, चलन प्रती, आदि मागीतले होते सदर माहिती आपण दडवलेली आहे. एकाच कुटूंबात प्रत्येक मुलाचे नावे आणि त्याचे वडीलाचे नावे असे दहा ते आकरा परवाने ( कोटलवार यांचे कडे ) देण्यात आलेले आहेत. नियमानुसार हे कसे काय शक्य आहे? या बाबतीत आपण शासनाचे नियम धाब्यावर बसवले आहेत.

आपण दि. 09/04/2013 चे पत्रावदारे मुळ अभिलेखपाल वहीमध्ये माझे नावे केरोसीन परवाना नोंद नाही असे खोटे सांगून माझा अर्ज निकाली काढला तथापी तहसील कार्यालयाने दिनांक 12/08/2013 रोजी माझ्या नावानिशी परवाना क्रमांक असलेली यादी दिलेली आहे. एवढेच नव्हे तर मी जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात मला परवाना नक्कल मिळणे बाबत दि. 27/08/2013 रोजी नक्कल मागण्यासाठी अर्ज सादर केला त्यामध्ये पुरवठा विभागाने सदरची संचिका अभिलेखा विभागात दिली नसल्याने मला कळविले आहे. यावरून देखील या प्रकरणी आपण माहिती लपवली आहे. तसेच दि.23/08/2013 चे अर्जान्वये मागीतलेली माहिती आपण दिलेले नाही.

वरील सर्व बाबी वरून सन.1986 च्या परवाना क्रं. 91822 चे आजपर्यंत काय झाले याची माहिती देण्यासाठी आपण टाळाटाळ ,खोटी, दिशाभूल करणारी माहिती देऊन माहिती अधिकाराच्या कायदयाचे उल्लंघन केलेले आहे.

वरील सर्व प्रकरणी मला पुढे अपील करावे लागेल तसेच माझे कुटूंबासह आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसावे लागेल करीता आपण सदर परवान्याची संपूर्ण हिस्ट्री ( इतिहास ) वस्तुनिष्ट स्वरूपात मला त्वरीत देऊन सहकार्य करावे. आपण सहकार्य कराल हीच अपेक्षा. आठ (8) ही अपील प्रकरणात हाच लेखी युक्तीवाद ग्राहय धरण्यात यावा. असा लेखी युक्तीवाद सादर केला.

अपिलार्थी यांनी सादर केलेल्या युक्तीवादातील अंशत: मुद्दे या अपील प्रकरणा संबंधी आहेत. उर्ववरीत मुद्दे या प्रकरणाचे संबंधित नाहीत. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी दिनांक 13/08/2013 रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना दिली असले बाबत सुनावणीच्या वेळी युक्तीवाद केला. मागणी केलेली माहिती मिळाली बाबत अपिलार्थी यांनी कबूल केले. म्हणून हे प्रधिकरण खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

1. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना मागणी केलेली माहिती दिलेली असल्याने अपील निकाली काढण्यात येते.
2. निम्न स्वाक्षरीत प्रथम अपिलीय अधिकारी यांचे अपिलीय प्रधिकारी मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ औरंगाबाद हे असून निर्णयाच्या दिनांकापासून अपिलीय कालावधी (90) दिवसाचा आहे.
3. मा.राज्य माहिती आयुक्त खंडपीठ औरंगाबाद यांचे कार्यालयाचा पत्ता- बचत भवन लेखा व कोषागार भवन च्या पाठीमागे औरंगाबाद, दुरध्वनी क्रमांक 0240 - 2352544

स्थळ : लातूर

दिनांक ; 05/10/2013

**स्वाक्षरीत**

**( शिवकुमार स्वामी )**
**अपीलीय अधिकारी तथा**
**सहा.जिल्हा पुरवठा अधिकारी,लातूर**

**<u>अग्रेषीत</u>**

1. श्री. इंगळे वसंत एकनाथराव सिध्देश्वर चौक मळवटीरोड, राजेगावकर सर यांचे घर ,लातूर (U.P.C.)
2. जनमाहिती अधिकारी तथा अव्वल कारकून पुरवठा -6 जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, लातूर यांना अनुपाननार्थ . प्रथम अपील प्रकरणातील मुळ संचिका पाने 1 ते या सोबत.
3. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी यांना http:/ latur.nic.in या संकेतस्थळावर upload करीता.